स्वातंत्र्य दिनानिमित्ताने भारतीय लष्करातील सैनिकांना व त्यांच्या कार्याला अभिवादन करण्याच्या उद्देशाने पुण्यात 'तिरंगा फेस्टिवल २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे. 'किरण साळी मित्र परिवार' आणि 'ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र'च्यावतीने शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ ते रात्री ८ या वेळेत श्री जंगली महाराज रस्त्यावरील बालगंधर्व रंगमंदिर चौकाजवळ, छत्रपती संभाजी महाराज उद्यानासमोर 'तिरंगा फेस्टिवल २०२५' होणार आहे, अशी माहिती आयोजक किरण साळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संपूर्ण महाराष्ट्रात अशा प्रकारचा फेस्टिवल पहिल्यांदाच होत आहे. देशरक्षणार्थ प्राणांची बाजी लावणाऱ्या भारतीय सैनिकांच्या पाच वीरपत्नींचा सन्मान 'तिरंगा फेस्टिवल'मध्ये करण्यात येणार आहे. यामध्ये वीरपत्नी मीनाक्षी भिसे, राणी चौधरी, सुस्मिता पालेकर, प्रतिमा खटके, दिपाली मोरे यांचा समावेश आहे. तिरंगी उपरणे आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा यथोचित गौरव होणार आहे. सेनाधिकारी 'पद्मश्री' मुरलीकांत पेटकर यांच्या हस्ते सन्मान सोहळा होणार असून विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

'ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र'अंतर्गत असलेल्या पुण्यातील ढोल-ताशा पथकांतील ५०० हून अधिक वादक एकत्रितपणे वाद्यवादन करणार आहेत. ढोल-ताशावादनातून 'ऑपरेशन सिंदूर' व 'ऑपरेशन महादेव'मधील वीरांना मानवंदना देण्यात येणार आहे. विविध वाद्यांचा सुरेल अविष्कार असलेला 'नादरंग-तालवाद्यकचेरी' हा कार्यक्रमदेखील होणार आहे. याशिवाय, प्रख्यात कलादिग्दर्शक गणेश लोणारे व सहकारी यांचे देशभक्तीपर पथनाट्य व सादरीकरण होणार आहे.

# क्रांतिकारक हुतात्मा विष्णु पिंगळे यांना कविसंमेलनातून अभिवादन

**पुणे, दि. १२ : प्रतिनिधी**

आद्यक्रांतिकारक विष्णु पिंगळे स्मृतिस्थळ, तळेगाव ढमढेरे येथे 'शब्दधन काव्यमंच'तर्फे नुकतेच क्रांतिकाव्यसंमेलन आयोजित करण्यात आले. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार अरुण बोऱ्हाडे होते. निवृत्त वायुसेना सैनिक नामदेव हुले, एव्हरेस्टवीर श्रीहरी तापकीर, तळेगाव ढमढेरे गावच्या उपसरपंच किर्ती गायकवाड हे प्रमुख अतिथी होते.

याप्रसंगी ग्रंथपाल शोभा हिंगणे, सामाजिक कार्यकर्ते अविनाश कंक, हभप अशोक महाराज गोरे, आण्णा गुरव, पांडुरंग सुतार, दत्तात्रय कांगळे यांची उपस्थिती होती.क्रांतिवीर विष्णु पिंगळे स्मारकाच्या प्रवेशद्वारापासून ते स्मारकस्थळापर्यंत 'वन्दे मातरम्', 'इन्कलाब जिंदाबाद', 'शहीद विष्णु पिंगळे अमर है' अशा घोषणा देत फेरी काढण्यात आली. याप्रसंगी अरुण बोऱ्हाडे म्हणाले, ''क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. हसत हसत फासावर गेले. म्हणून आपला देश स्वतंत्र झाला. ही आठवण सर्वांनी ठेवणे आवश्यक आहे.''

### विविध मागण्यांसाठी स्टेशन मास्तरांचे आंदोलन

**पुणे** : 'ऑल इंडिया स्टेशन मास्टर्स असोसिएशन पुणे मंडळा'च्यावतीने आज विविध मागण्यांसाठी भव्य आंदोलन करण्यात आले. पुणे रेल्वे मंडळातील शेकडो स्टेशन मास्टर्स, साहाय्यक कर्मचारी व संबंधित पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनात उत्स्फूर्त सहभाग घेतला. आंदोलनानंतर मंडळ रेल्वे व्यवस्थापकांना १९ प्रमुख मागण्यांचे सविस्तर स्मरणपत्र देण्यात आले. या आंदोलनात माजी राष्ट्रीय महामंत्री धनंजय चंद्रात्रय, मंडल सचिव पुरुषुत्तम सिंग, मंडल अध्यक्ष कृष्ण मुरारी, तसेच स्टेशन मास्टर अजय सिन्हा, अमित कुमार, गंगाधर शाहू, अर्जुन कुमार, शकील इनामदार, दिनेश कांबळे, गोपाल कुमार यांसह पुणे मंडळातील एकूण १३० स्टेशन मास्टर्स उपस्थित होते. त्यांनी यावेळी विविध मागण्या केल्या आहेत. याबाबतचे निवेदन देखील त्यांनी दिले आहे.

# 'बीएनसीए'चा वर्धापन दिन विविध उपक्रमांद्वारे उत्साहाने साजरा

**पुणे, दि. १२ : प्रतिनिधी**

'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थे'च्या डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेन्चा (बीएनसीए) ३१वा वर्धापन दिन विविध उपक्रमांमधून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने २०२४-२५ मध्ये विद्यावाचस्पती (पीएच.डी.), पदव्युत्तर पदवी आणि पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या सुमारे २०० विद्यार्थिनींना 'बीएनसीए'तर्फे उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमात प्रमाणपत्र घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याशिवाय 'बीएनसीए'च्या चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी परिषदेत नेमणूक करण्यात आल्या. त्यांना प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप व प्राध्यापकांच्या हस्ते बॅजेस सेरेमनीमधून समारंभपूर्वक बॅजेस प्रदान करण्यात आले.




'बीएनसीए'मधील प्रमाणपत्र देण्याच्या कार्यक्रमात 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट'चे (आयआयए) पुणे विभागाचे अध्यक्ष आर्किटेक्ट विकास आचलकर आणि प्रसिद्ध वास्तुरचनाकार संदीप महाजन यांच्यासह 'बीएनसीए'चे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप, उपप्राचार्य डॉ. शार्वेय धोंगडे, तसेच 'महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थे'चे ज्येष्ठ पदाधिकारी इंजिनिअर जयंत इनामदार आणि 'बीएनसीए'तील परीक्षा विभागाच्या प्रमुख डॉ. धरती सोटे उपस्थित होते. डॉ. अमृता गरुड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त 'बीएनसीए'तर्फे तयार करण्यात आलेला 'मानवी बांधकाम पर्यावरण आणि त्यापलीकडील आव्हाने आणि संधी' (बिल्ट एन्व्हायरमेंट अँड बियॉण्ड चॅलेंजेस अँण्ड अपॉर्च्युनिटी) या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या शोधनिबंधांवरील संकलित प्रतीचे प्रकाशन झाले. त्यावेळी या परिषदेच्या निमंत्रक डॉ. वैशाली लाटकर यांच्यासह सहनिमंत्रक डॉ. मीरा शिरोळकर, तसेच डॉ. स्वाती सहस्रबुद्धे आणि प्रा. निशिगंधा साखरदंडे उपस्थित होते.

प्रमाणपत्र देण्याच्या समारंभानिमित्ताने आर्किटेक्ट आचलकर यांनी प्रमाणपत्र घेणाऱ्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विविध प्रकारच्या इमारतींची कौशल्यपूर्ण रचना (डिझाईन) करण्याची संधी मिळणार असून त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे,'' असे स्पष्ट केले.

डॉ. कश्यप यांनी आपल्या भाषणात ''विद्यार्थिनींना आर्किटेक्चर क्षेत्रात निश्चितच उज्ज्वल भवितव्य आहे,'' असे सांगितले. ते म्हणाले की, ''आमच्या अभ्यासक्रमात जगभरातील गोष्टींमधील विकास तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यावर भर दिला.

# रिजनरेटिव्ह मेडिसिनचे पुण्यात नवीन पर्व

**पुणे, दि. १२ : प्रतिनिधी**

पुणेस्थित केके केअर हॉस्पिटलने जगातील सर्वांत अद्ययावत नॉन-सर्जिकल (शस्त्रक्रियेविना) आर्थोपेडिक्स उपचार प्रदान करण्यासाठी आर्थोरिन्यू सोबत सहयोग केला आहे. आर्थोरिन्यू हे अमेरिकास्थित रिजेनेक्स युएसएसचे भारतातील अधिकृत प्रतिनिधी आहेत. रिजेनेक्स युएसएची स्थापना २० वर्षांपूर्वी झाली असून त्यांनी जगभरात ५ लाख, २० हजारांहून अधिक रुग्णांवर यशस्वीरित्या उपचार केले आहेत. तसेच हे अनेक प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी एक विश्वासार्ह पर्याय ठरले आहे. मुंबईस्थित आर्थोरिन्यूने केके केअर हॉस्पिटलसोबत केलेल्या सहयोगामुळे लोकांना स्वतः च्या शरीराच्या पेशी वापरून शक्य असेल तिथे शस्त्रक्रिया टाळता विविध सामान्य आर्थोपेडिक समस्यांवर उपचार घेता येणार आहेत, ही माहिती पत्रकार परिषदेत भूलतज्ज्ञ व वेदना व्यवस्थापनतज्ज्ञ आणि केके केअर हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. वर्षा कुऱ्हाडे, वेदना व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. माधुरी लोकापूर, लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. श्रीकांत कुऱ्हाडे आणि आर्थोपेडिक सर्जन डॉ. तुषार चौधरी यांनी दिली.

याप्रसंगी फिजिशियन डॉ. महावीर सतीशचंद बगरेचा व आर्थोरिन्यूचे दिग्गज देसाई उपस्थित होते.

### ज्येष्ठांना मोठा आधार

वृद्ध व्यक्तींची वाढती लोकसंख्या, खेळाडूंची वाढती संख्या आणि त्यांना होणाऱ्या दुखापती, असामान्य वेदनांना कारणीभूत असलेल्या दीर्घकालीन आजारामध्ये वाढ या सर्व बाबी लक्षात घेता, वेदना व्यवस्थापन हे नजीकच्या भविष्यात भारतातील एक प्रमुख सुपर स्पेशालिटी म्हणून उदयास येईल. पेन फिजिशियन्सचे प्रमाण हे खूप कमी आहे. त्यामुळे ज्येष्ठांना हा खूप मोठा आधार ठरेल.



भूलतज्ज्ञ व वेदना व्यवस्थापनतज्ज्ञ आणि केके केअर हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. वर्षा कुऱ्हाडे म्हणाल्या की, ''हा सहयोग अस्थी स्नायूंच्या (मस्क्युलोस्केलेटल) स्थितींच्या समस्यांवरील उपचारांसाठी अद्ययावत इंटरव्हेंशनल आणि विनाशस्त्रक्रिया पर्याय प्रदान करेल. रिजनरेटिव्ह मेडिसिनमध्ये विविध उपचार योजनांचा समावेश आहे.

त्यांचे पेटंट रिजेनेक्स युएसएकडे असून यामध्ये सुपर कॉन्सेन्ट्रेटेड प्लेटलेट्स आणि मेसेनकायमल पेशी (हाडे व कूर्चाशी जोडलेल्या पेशी) वापरल्या जातात.

यामध्ये प्लेटलेट प्लाझ्माचे प्रमुख स्रोत असलेल्या मेसेनकायमल पेशींमधून रक्ताचा नमूना काढला जातो व त्यानंतर रक्ताच्या नमुन्यावर लॅबमध्ये प्रक्रिया करून आणि लोकल नेस्थेशिया देऊन ते परत शरीरात टाकले जातात, जेणेकरून शरीरातील स्वउपचार यंत्रणा उत्तेजित होते.

प्लेटलेटसचे केंद्रीकरण हे नियमित 'पीआरपी'पेक्षा ३० पट जास्त असते. या तंत्रज्ञानाला युएस एफडीएची मान्यता आहे. भारतात १८ ते ८९ वयोगटातील रुग्णांवर रिजनरेटिव्ह प्रक्रिया करण्यात आली असून अस्थिस्नायूंच्या विविध समस्या (मस्क्युलोस्केलेटल) असलेल्या रुग्णांसाठी ही प्रक्रिया अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे.

जेव्हा एखादा रुग्ण ओपीडीमध्ये येतो, तेव्हा सोनोग्राफीच्या मदतीने नेमके कोणत्या भागात वेदना होत आहे, ते स्थान शोधता येते.

उदा. जर एखाद्याच्या खांद्याला वेदना होत असतील, तर आपण त्या व्यक्तीला त्याचे खांदे हलवण्यास सांगू आणि स्नायूंमध्ये वेदना सुरू होण्याची नेमकी जागा शोधू. म्हणजेच अशा प्रकारे आपण अचूकपणे जागा शोधू शकतो. हे करत असताना कोणत्याही प्रकारच्या उपचारानंतर शरीराची हालचाल इष्टतम राखण्यासाठी फिजिओथेरपीची महत्त्वाची भूमिका ही कायम आहे.

# अमली पदार्थ सेवनाला विरोध ढोल-ताशाच्या माध्यमातून करा

पोलीस उपायुक्त रावले यांचे आवाहन

**पुणे, दि. १२ : प्रतिनिधी**

''पुण्याचे अनुकरण सगळीकडे केले जाते. त्यामुळे पुण्यातील तरुणाई संस्कृतीविषयी एकनिष्ठ राहिली, तर देश तुमच्याकडे पाहील आणि तुमचे अनुकरण करेल. त्यामुळे शहरात ड्रग्स अजिबात नकोत. धूम्रपान, मादक पदार्थांचे सेवन करणे 'कूल' नाही. ही भावना मनात रुजवा. याचे ब्रँडिंग ढोल-ताशाच्या माध्यमातून करा,'' असे आवाहन परिमंडळ-१चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांनी केले.

PNG JEWELLERS

## पी एन गाडगीळ ज्वेलर्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ६९४, नारायण पेठ, पुणे, महाराष्ट्र - ४११०३०
सीआयएन: L36912PN2013PLC149288, ई-मेल आयडी: secretarial@pngadgil.com
वेबसाईट: www.pngjewellers.com, दूर. क्र.: ०२०-२४४७८४७४

**दि. ३० जून, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षाचे विवरणपत्र**

दि. ३० जून, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता कंपनीचे अलेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित आणि शिफारस करण्यात आले आणि कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी घेण्यात आलेल्या संबंधित सभेमध्ये मंजूर करण्यात आले.

लेखापरिक्षित अहवालासह वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या वेबसाईट https://www.pngjewellers.com/pages/investors#financial-results वर प्रसिद्ध करण्यात आले आहेत आणि ते क्युआर कोड स्कॅन करून प्राप्त करता येतील.

मंडळाच्या आदेशाद्वारे
सही/-
सौरभ गाडगीळ
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन: ००६१६५६३)

ठिकाण: पुणे
दिनांक: १२ ऑगस्ट, २०२५

टीप: वरील माहिती सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ४७(१) सह वाचावयाच्या विनियमन ३३ नुसार आहे.

# राष्ट्रकुल २०३० स्पर्धेसाठी अहमदाबादची निवड

## ‘आयओए’च्या विशेष सर्वसाधारण सभेत आज शिक्कामोर्तब

**पीटीआय, नवी दिल्ली**

**ऑलिम्पिक स्पर्धेपूर्वी** भारत २०३० राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यास उत्सुक असून, यासाठी यजमान म्हणून अहमदाबाद शहराची निवड निश्चित असून, भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) आज होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेत यजमान शहराच्या नावासह भारताच्या अंतिम बोलीला मान्यता देण्यात येईल.

या स्पर्धेच्या आयोजनाच्या शर्यतीत असलेल्या कॅनडाने यापूर्वीच माघार घेतली असल्यामुळे यजमानपदाचा मान भारताला मिळण्याची शक्यता बळावली आहे. त्यातच गेल्या आठवड्यात राष्ट्रकुल क्रीडा महासंघाच्या एका शिष्टमंडळाने देखील भारताचा दौरा करून ‘आयओए’च्या पदाधिकाऱ्यांची भेट घेतली आहे.

कॅनडाच्या माघारीनंतर भारताने आयोजनासाठी कंबर कसली असून, यजमानपद मिळवण्यासाठी संपूर्ण ताकदीने बोली लावण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी यजमान शहराच्या नावासह ३१ ऑगस्टपूर्वी भारताला अंतिम बोली सादर करावी लागेल. यजमान शहरासाठी भारताने अहमदाबादचे नाव निश्चित केले आहे. सध्या भारत दौऱ्यावर असलेले राष्ट्रकुल क्रीडा महासंघाचे शिष्टमंडळ आता पुढील आठवड्यात अहमदाबादचा दौरादेखील करणार आहे. राष्ट्रकुल खेळाचे संचालक डॅरेन हॉल यांच्या नेतृत्वाखाली हे शिष्टमंडळ अहमदाबादमधील केंद्राची पाहणी करण्याबरोबरच गुजरात सरकारशी देखील चर्चा करणार आहे.

राष्ट्रकुल क्रीडा महासंघाची सर्वसाधारण सभा नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ग्लासगो येथे होणार असून, या सभेत २०३०च्या यजमानपदाचा निर्णय होणार आहे. यजमानपदाची विश्वासार्हता, क्रीडा केंद्राच्या सुविधा आणि प्रादेशिक आकर्षणाच्या दृष्टीने असलेली लवचीकता यावर यजमानपदाचा निर्णय अवलंबून राहणार आहे.

‘आयओए’च्या मुख्यालयात ही बैठक होणार असून, यामध्ये केवळ राष्ट्रकुल स्पर्धा आयोजनासाठी बोली सादर करण्यास मान्यता देणे, २०२३-२४च्या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणावर चर्चा आणि मंजुरी तसेच २०२४-२५च्या लेखापरीक्षणासाठी योग्य लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे या तीन गोष्टींवरच चर्चा होणार आहे.

### सभेत कोणाला मतदानाचा अधिकार

- ‘आयओए’च्या घटना अनुच्छेद १०.१ नुसार राष्ट्रीय क्रीडा महासंघाचे दोन सदस्य (एक महिला), दोघांनाही मतदानाचा अधिकार
- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीमधील भारताचा एक प्रतिनिधी
- खेळाडू आयोगाचे दोन प्रतिनिधी (एक महिला), दोघांनाही मतदानाचा अधिकार
- उत्कृष्ट गुणवत्तेचे आठ खेळाडू (चार महिला) प्रत्येकी एक मत
- अनुच्छेद १०.३ अनुसार राज्य, केंद्रशासित प्रदेश ऑलिम्पिक संघटना, क्रीडा नियंत्रण मंडळ आणि १०.१ मध्ये नाव नसलेल्या सहयोगी राष्ट्रीय क्रीडा महासंघातील प्रत्येकी एक सदस्य (यापैकी कुणालाही मतदानाचा अधिकार नसेल)
- अनुच्छेद १०.१ नुसार मान्यताप्राप्त ३३ राष्ट्रीय क्रीडा महासंघाची यादी ‘आयओए’ संकेतस्थळावर प्रसिद्ध.

# संक्षिप्त

### बिशप्स, पेटिट प्रशालेचे दणदणीत विजय

**पुणे :** आंतरशालेय सुब्रतो मुखर्जी करंडक फुटबॉल स्पर्धेत १७ वर्षांखालील वयोगटात कल्याणीनगरच्या दि बिशप्स, आणि जे.एन. पेटिट प्रशाला संघांनी तिसऱ्या फेरीत दणदणीत विजयाची नोंद केली. बिशप्स प्रशाला संघाने पुष्पा इंटरनॅशनल प्रशाला संघाचा ६-० असा पराभव केला. आरव नेलंथराने दोन, तर पार्थ जैन, अदनान जाकीर, सिन पिंटो, रायनमुथेदान यांनी एकेक गोल केला. पेटिट प्रशाला संघाने खडकीच्या सेंट जोसेफ प्रशालेचा ९-० असा धुव्वा उडवला. दक्ष पिल्लेने हॅटट्रिकसह पाच गोल नोंदवले. त्याला सिद्धार्थ जगदाळे दोन, तर पार्थ सोनावणे, अधान शेख यांनी एकेक गोल करुन सुरेख साथ केली.

### बुद्धिबळ : निहिरा कौल विजेती



**पुणे :** जिल्हा आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेत मुलींच्या १७ वर्षांखालील गटात पवार पब्लिक स्कूलच्या निहिरा कौलने नऊ फेऱ्यांच्या स्पर्धेत ९ गुणांसह वैयक्तिक आघाडी राखत विजेतेपद मिळविले. वॉलनट प्रशालेची ताश्वी वर्तक ८ गुणांसह दुसऱ्या, तर सेंट थॉमस प्रशालेची अपूर्वा लामकाने ७.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिली. अखेरच्या फेरीत निहीराने बिशप्स को-एड प्रशालेच्या ग्रिषा कटारियाचा पराभव केला. ताश्वीने गोळवलकर गुरुजी विद्यालयाच्या सई देवला पराभूत केले.

### पुण्याच्या मुलींच्या संघाचा ठाण्यावर विजय

**पुणे :** वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेच्या वतीने आयोजित वरिष्ठ गटाच्या राज्य आंतरजिल्हा फुटबॉल स्पर्धेत पुणे जिल्हा संघाने ठाणे संघावर ६-१ असा दणदणीत विजय मिळविला. रितीका सिंगने तीन, तर सेनोरिटा नोंगपिलाह, आदिती गोडेकर, पूर्वा गायकवाड यांनी एकेक गोल केला. ठाण्याकडून एकमेव गोल हरलीन कौरने नोंदवला.

# आशिया चषकात बुमरा खेळण्याची शक्यता

## उपकर्णधारपदासाठी अक्षर, गिलमध्ये स्पर्धा



**नवी दिल्ली :** इंग्लंडविरुद्धच्या यशस्वी मालिकेनंतर आता भारतीय चाहत्यांना आशिया चषक ट्वेन्टी-२० स्पर्धेचे वेध लागले असून, सर्वाधिक चर्चा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराची उपलब्धता आणि उपकर्णधाराच्या नियुक्तीवरून सुरू आहे.

आशिया चषक स्पर्धा ट्वेन्टी-२० प्रारूपात असल्यामुळे बुमराला अधिक गोलंदाजी करावी लागणार नाही. त्यामुळे या स्पर्धेत बुमरा खेळण्याची शक्यता बळावली आहे. मात्र, त्यामुळे बुमराला स्पर्धेपाठोपाठ लगेच होणाऱ्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यासाठी विश्रांती दिली जाईल असे मानले जात आहे.

‘बीसीसीआय’च्या उत्कृष्टता केंद्रातील (सेंटर ऑफ एक्सलन्स) तज्ज्ञ भारतीय खेळाडूंच्या तंदुरुस्तीबाबत वैद्यकीय अहवाल कधी पाठवते यावर या स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड अवलंबून आहे. सूत्रांच्या माहितीनुसार १९ किंवा २० ऑगस्ट रोजी संघ निवडण्यासाठी निवड समितीची बैठक होऊ शकते.

निवड समितीला काही कठीण निर्णय घ्यावे लागणार असले, तरी कर्णधारपदात बदल होण्याची शक्यता खूपच कमी आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने चांगले यश मिळविले आहे. निवड समितीसमोर फक्त उपकर्णधाराच्या नियुक्तीचा पेच असेल. भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर असताना अक्षर पटेलला उपकर्णधार करण्यात आले होते. आता दौरा संपल्यावर निवड समिती कर्णधार शुभमन गिलकडे वळणार की अक्षरलाच कायम ठेवणार याकडे सर्वांच्या नजरा आहेत.

अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, सूर्यकुमार, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या ही पहिली पाच नावे निश्चित मानली जात असली, तरी इंग्लंडमधील गिलची लय लक्षात घेता त्याला विसरता येणार नाही. यशस्वी जैस्वाल आणि साई सुदर्शनसाठीदेखील संघात जागा शोधणे निवड समितीला त्रासदायक ठरणार आहे.

# ब्रेव्हिसच्या विक्रमी शतकामुळे दक्षिण आफ्रिकेचा विजय

**डार्विन :** मधल्या फळीत २२ वर्षीय डेवॉल्ड ब्रेव्हिसने (५६ चेंडूंत नाबाद १२५) झळकावलेल्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ५३ धावांनी पराभव केला. ब्रेव्हिससची शतकी खेळी दक्षिण आफ्रिकेसाठी विक्रमी ठरली. या विजयाने तीन सामन्यांची मालिका आता १-१ अशी बरोबरीत आली आहे.

प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या सहा षटकांत ३ बाद ५७ अशा स्थितीत खेळायला आलेल्या ब्रेव्हिसने नंतर एकाहाती ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना हताश केले. ब्रेव्हिसने ४१ चेंडूंत शतक झळकावले. यामध्ये १२ चौकार आणि ८ षटकारांची आतषबाजी केली. त्याने ट्रस्टिन स्टब्सच्या साथीत चौथ्या गड्यासाठी १२६ धावांची भागीदारी केली. या भागीदारीत स्टब्सचा वाटा केवळ ३१ धावांचा होता. दक्षिण आफ्रिकेला ब्रेव्हिसच्या झंझावातामुळे २० षटकांत ७ बाद २१८ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाविरुद्धची दक्षिण आफ्रिकेची ही सर्वोच्च धावसंख्या ठरली.



आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना फटकेबाजीत स्वातंत्र्य घेता आले नाही. टिम डेव्हिडच्या २४ चेंडूंतील वेगवान ५० धावांच्या खेळी व्यतिरिक्त एकही फलंदाज खेळपट्टीवर टिकू शकला नाही. ऑस्ट्रेलियाचा डाव १७.४ षटकांत १६५ धावांत आटोपला. क्वेना मफाकाने (३/५७), तर कॉर्बिन बॉशने (३/२०) चांगली गोलंदाजी केली.

# एरिगेसीचे बरोबरीवर समाधान

**चेन्नई :** भारताचा ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसीने मंगळवारी चेन्नई ग्रँडमास्टर्स स्पर्धेच्या सहाव्या फेरीतील सामन्यात गुणतालिकेत अग्रस्थानी असणाऱ्या व्हिन्सेन्ट केमेरला बरोबरीवर रोखले. यानंतर केमेरने मास्टर्स गटात एका गुणासह आपले शीर्ष स्थान भक्कम केले. एरिगेसी त्याच्या मागे आहे. अमेरिकेचा ग्रँडमास्टर अवंडर लियांगने भारताच्या १८ वर्षीय प्रणव वी. याला बरोबरीत रोखण्याची कामगिरी केली.

केमेरने एरिगेसीविरुद्ध आक्रमक सुरुवात करीत वर्चस्व प्रस्थापित केले. मात्र, एरिगेसीने चांगला बचाव करीत संयम दाखवला. मास्टर्स गटात विदित गुजराथी आणि अनिश गिरी यांनाही बरोबरीवर समाधान मानावे लागले. तर, जॉर्डनच्या व्हॅन फॉरेस्टने निहाल सरीनविरुद्ध काळ्या मोहऱ्यांसह खेळताना विजय नोंदवला.

# वार्षिक सभेपर्यंत बिन्नीच ‘बीसीसीआय’चे अध्यक्ष

## क्रीडा विधेयक मंजुरीचा फायदा



**बंगळूरु :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) क्रीडा विधेयकानुसार माहितीच्या अधिकारात येणार नसले, तरी विधेयकातील उर्वरित तरतुदी त्यांना बंधनकारक असतील. अशाच एका तरतुदीचा फायदा अध्यक्ष रॉजर बिन्नी यांना झाला असून, ७० वर्षीय रॉजर बिन्नी सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या ‘बीसीसीआय’च्या वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत अध्यक्ष राहू शकतात.

विधेयकातील तरतुदीनुसार एखादी व्यक्ती ७० वर्षे होण्यापूर्वी अध्यक्ष असेल, तर त्याला अध्यक्षपदाचा कार्यकाळ पूर्ण करता येणार आहे. त्यानंतर अन्य राज्य संघटनेच्या सहमतीनुसार ती व्यक्ती ७५ वर्षांपर्यंत अध्यक्ष राहू शकते. अर्थात, ‘आयसीसी’च्या घटनेनुसार अध्यक्षपदासाठी वयाची कुठलीच अट नाही.

विधेयक स्वीकारायचे की नाही यावर अजून ‘बीसीसीआय’चा निर्णय झालेला नाही. पण, या तरतुदीचा फायदा बिन्नी यांना मिळणार आहे. आता त्यानंतर त्यांनी अध्यक्ष राहायचे की नाही याचा निर्णय अन्य सदस्य आणि ‘बीसीसीआय’शी निगडित ताकदवान व्यक्तीच घेऊ शकणार आहेत.

‘बीसीसीआय’ची कायदेशीर समिती अजून विधेयकाचा अभ्यास करीत आहे. आमच्याकडे यासाठी अजून थोडा वेळ आहे, त्यामुळे कायदेशीर समितीच्या सल्ल्यानुसार विधेयकाबाबत ‘बीसीसीआय’ पावले उचलणार आहे, असे एका पदाधिकाऱ्याने सांगितले.

# गुकेश तिसऱ्या स्थानी

**सेंट लुईस (अमेरिका) :** भारताचा जगज्जेता दोम्माराजू गुकेशला अमेरिकेच्या लेव्हॉन ॲरोनियनकडून पहिल्या फेरीत मिळालेल्या पराभवानंतर पुनरागमन करताना ग्रिगोरी ओपेरिन आणि लिएम ले क्वांगविरुद्ध विजय नोंदवला. या कामगिरीमुळे गुकेश ग्रँड बुद्धिबळ दौऱ्यांतर्गत असलेल्या सेंट लुईस जलद (रॅपिड) आणि अतिजलद (ब्लिट्झ) बुद्धिबळ स्पर्धेच्या पहिल्या दिवशी संयुक्तपणे तिसऱ्या स्थानी राहिला.

गुकेशची सुरुवात चांगली राहिली नाही आणि पहिल्या फेरीतील चुरशीच्या लढतीत त्याला ॲरोनियनकडून हार पत्करावी लागली. मात्र, यानंतर पुनरागमन करताना त्याने ओपेरिन व लिएम यांना नमवीत संभावित सहापैकी चार गुणांची कमाई केली. पहिल्या फेरीत पराभूत झालेल्या गुकेशने दुसऱ्या फेरीत पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना ओपेरिनला सहज नमविले. अखेरच्या लढतीत त्याने लिएमविरुद्ध काळ्या मोहऱ्यांसह खेळताना चमक दाखवली.

# पुणे, मध्य मुंबई, उत्तर मुंबईचे दोन्ही संघ उपांत्यपूर्व फेरीत

**पुणे :** १८ वर्षांखालील गटाच्या राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेत पुणे, मध्य मुंबई, उत्तर मुंबईच्या मुलामुलींच्या संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत पुण्याच्या मुलींनी सलग दुसऱ्या सामन्यात गुणांचे शतक गाठले. लक्ष्मी जोशीने १९ तर, अक्षया पाटीलने १७ गुणांची नोंद करताना पुण्याच्या शतकी गुणांत मोठा वाटा उचलला. पुण्याने अहिल्यानगर संघावर १००-३९ असा विजय मिळविला.



त्यापूर्वी पुण्याच्या मुलींनी अनुषा सोनटक्के आणि आर्या पतांगरे यांच्या सुरेख खेळाच्या जोरावर परभणीचा ६९-८ असा पराभव केला. दक्षिण पूर्व मुंबई संघाने मध्यंतराच्या ३२-० अशा विजयी आघाडीनंतर जळगांववर ५२-६ असा विजय मिळविला. अपराजिता दास हिने सर्वाधिक ९ गुण नोंदवले. अन्य सामन्यात नांदेडने गोंदियाचा ४९-१, पालघरने चंद्रपूरचा १८-१, बीडने रायगडचा ३९-७, धुळे संघाने दक्षिण पश्चिम मुंबई संघाचा ३१-२६ असा पराभव केला. मध्यंतराला या सामन्यात १४-१४ अशी बरोबरी होती.

मुलींच्या गटातून पुणे, मध्य मुंबई, उत्तर मुंबई, कोल्हापूर, नागपूर, ठाणे, नांदेड, तर मुलांच्या गटातून पुणे, कोल्हापूर, सातारा, नाशिक, नागपूर, मध्य मुंबई, दक्षिण पूर्व मुंबई, उत्तर मुंबई संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.


**PREMIER LTD.**

नोंद. कार्यालय: गट 169, सावरदरी गाव, तालुका खेड (चाकण औद्योगिक परिसर), पुणे- 410501
CIN: L34103PN1944PLC020842; ई-मेल : Investors@premier.co.in

**30 जून, 2025 रोजी संपलेल्या तिमाहीच्या स्वतंत्र व एकत्रित वित्तीय निकालांचा सारांश**

(रु. लाखामध्ये)

| अ. क्र. | तपशील | स्वतंत्र व एकत्रित 30.06.2025 रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित/ पुनरावलोकित) | 31.03.2025 रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित/ पुनरावलोकित) | 30.06.024 रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित/ पुनरावलोकित) | या दिनांकास संपलेले वर्ष 31.03.2025 (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | संचालातून एकूण उत्पन्न | 28 | 29 | 25 | 107 |
| 2 | अपवादात्मक बाबी आणि करपूर्व सदर कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (194) | (233) | (192) | (814) |
| 3 | करपूर्व सदर कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (194) | (233) | (192) | (814) |
| 4 | करपश्चात सदर कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (194) | (233) | (192) | (814) |
| 5 | सदर कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न [सदर कालावधीसाठी (करपश्चात) नफा/(तोटा) चा आणि इतर एकूण सर्वंकष उत्पन्नाचा (करपश्चात) समावेश असलेले] | **(194)** | **(233)** | **(192)** | **(814)** |
| 6 | समभाग भांडवल | 3037 | 3037 | 3037 | 3037 |
| 7 | राखीवे (पुनर्मूल्यांकन राखीवे वगळता) | - | - | - | (43958) |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती (प्रत्येकी रु. 10/- चा) | | | | |
| | मूळः | (0.64) | (0.77) | (0.63) | (2.68) |
| | सौम्यीकृतः | (0.64) | (0.77) | (0.63) | (2.68) |

**टीपा:** 1) एनसीएलटी खंडपीठ, मुंबई यांच्या दि. 29 जानेवारी, 2021 रोजीच्या आदेशान्वये कंपनी कॉर्पोरेट नादारी प्रक्रियेतून जात आहे. त्यामुळे, निराकरण व्यावसायिकाने (आरपी) कंपनीच्या संचालन व व्यवस्थापनाचे नियंत्रण घेतले आहे आणि वरील निकाल आरपी यांनी रेकॉर्डवर घेतले.
2) वरील निकाल कंपनी अधिनियम, 2013 मधील अनुच्छेद 133 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या कंपन्या (इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्डस) नियम, 2015 (IndAS) च्या अनुषंगाने तयार करण्यात आले आहेत.
3) वर सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम, 2015 च्या नियम 33 अंतर्गत स्टॉक एक्स्चेंज कडे सादर केलेल्या 30 जून, 2025 रोजी संपलेल्या तिमाहीच्या वित्तीय निकालाच्या तपशिलाचा सारांश देण्यात आलेला आहे. वित्तीय निकालांचा संपूर्ण तपशील स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाईटवर (www.bseindia.com आणि www.nseindia.com) येथे उपलब्ध आहे.

**प्रीमियर लिमिटेड करिता - सीआयआरपी**
**स्वा/- कनक जानी**
**निराकरण व्यावसायिक**
**आयपी नोंदणी क्र.** IBBI/IPA-001/IP-P-01757/2019-2020/12685

**स्थान: मुंबई**
**दिनांक: 13 ऑगस्ट, 2025**


## उताराचा क्रम सलग नवव्या महिन्यात

# महागाईचा दर आठ वर्षांच्या नीचांकी

**पीटीआय, नवी दिल्ली**

**जनसामान्यांसाठी ताप** ठरलेला महागाईचा दर सलग नवव्या महिन्यांत ओसरल्याचे मंगळवारी जाहीर झालेल्या आकडेवारी स्पष्ट केले. दिलासादायी बाब म्हणजे सरलेल्या जुलै महिन्यात हा दर आठ वर्षांची नीचांकी पातळीवर नोंदविला गेला आहे.

जुलै महिन्यात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई दर १.५५ टक्क्यांपर्यंत नरमला आहे, जो जूनमधील नोंदविल्या गेलेल्या २.१० टक्क्यांवरून लक्षणीय कमी झाला आहे.

जून २०१७ नंतरचा हा सर्वात कमी महागाई दर आहे, तेव्हा तो १.४६ टक्क्यांपर्यंत खाली नोंदविला गेला होता. तर जानेवारी २०१९ नंतर पहिल्यांदाच किरकोळ महागाई दर २ टक्क्यांपेक्षा कमी पातळीवर आला आहे.

जुलैमध्ये ग्रामीण भागातील महागाई १.१८ टक्के होती, जी जून महिन्यात १.७२ टक्के होती. त्या उलट शहरी भागातील महागाई किंचित वाढून जुलैमध्ये २.५६ टक्के झाली आहे, जी जूनमध्ये २.०५ टक्के नोंदवली गेली होती.

### काय, काय स्वस्त?



किरकोळ महागाई दर सलग सहा महिन्यांपासून रिझर्व्ह बँकेकडून निर्धारीत ४ टक्क्यांच्या सहनशील मर्यादा पातळीच्या आत राहिला आहे. म्हणजेच एप्रिल २०२५ पासून हा दर सरासरी ३ टक्क्यांपेक्षा कमी नोंदविण्यात आला आहे. या दरातील प्रमुख घटक म्हणजे खाद्यान्न महागाई दर सलग दुसऱ्या महिन्यात नकारात्मक क्षेत्रात राहिला आहे. जूनमधील उणे (-) १.१ टक्क्यांच्या तुलनेत, जुलैमध्ये त्यात उणे (-) १.८ टक्के अशी मोठी घसरण दिसली आहे. विशेष म्हणजे प्रथिनेयुक्त आहार असलेल्या डाळी, अंडी तसेच भाज्या, अन्नधान्य, साखर या खाद्य घटकांसह, वाहतूक खर्चाच्या किमती कमालीच्या घटल्याने मुख्यतः ही घसरण झाली आहे. जुलैमधील खाद्यान्न महागाईचा दर हा जानेवारी २०१९ नंतरचा सर्वाधिक कमी पातळीवर आला आहे.

# प्राप्तिकर कायद्याला अर्थमंत्र्यांकडून शुद्धिपत्राची जोड

## अग्रिम कराचा भरणा करण्यात तूट राहिल्यास ३ टक्के दराने व्याज

**पीटीआय, नवी दिल्ली**




**केंद्रीय अर्थमंत्रालयाने** सोमवारी लोकसभेने मंजूरी दिलेल्या प्राप्तिकर विधेयकासंबंधी शुद्धिपत्र मंगळवारी अधिसूचित केले. हे शुद्धिपत्र अग्रिम करासंबंधाने नव्याने केल्या गेलेल्या तरतुदीसंबंधाने असून, आता करदात्यांनी अग्रिम कराचा कमी भरणा केल्यास त्याला तुटीच्या रकमेवर ३ टक्के दराने व्याज भरावा लागणार आहे.

देशाच्या प्राप्तिकर प्रणालीतील महत्त्वपूर्ण सुधारणा मानता येईल असे विधेयक सोमवारी लोकसभेत कोणत्याही चर्चेविना मंजूर केले गेले.

सुधारीत रूपात ते सादर करण्यात आलेल्या या विधेयकाला दुसऱ्याच दिवशी शुद्धिपत्रही जोडावे लागले आहे. हा मंजूर नवीन प्राप्तिकर कायदा, आगामी आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल. अनेक तरतुदी आणि जटिल मानल्या गेलेल्या कायदेशीर भाषेचे नवीन कायद्यात सुलभीकरण केले गेले आहे.

प्राप्तिकर (क्रमांक २) विधेयक, २०२५ च्या कलम ४२५ मधील तरतुदींना हे शुद्धिपत्र जोडण्यात आले आहे. अर्थमंत्रालयाच्या मते, शुद्धीपत्रातील व्याजाच्या तरतुदी या नव्या नसून, त्या विद्यमान ६४ वर्षे जुन्या प्राप्तिकर कायदा, १९६१ मधील तरतुदींशी सुसंगतच आहेत. त्या नवीन कायद्यात केवळ कायम ठेवण्यात आल्या आहेत.


PNG JEWELLERS

**पी एन गाडगीळ ज्वेलर्स लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालयः ६९४, नारायण पेठ, पुणे, महाराष्ट्र - ४११०३०
सीआयएनः L36912PN2013PLC149288, ई-मेल आयडीः secretarial@pngadgil.com
वेबसाईटः www.pngjewellers.com, दूर. क्र.: ०२०-२४४७८४७४

**दि. ३० जून, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षाचे विवरणपत्र**

दि. ३० जून, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता कंपनीचे अलेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित आणि शिफारस करण्यात आले आणि कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी घेण्यात आलेल्या संबंधित सभेमध्ये मंजूर करण्यात आले.

लेखापरिक्षित अहवालासह वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या वेबसाईट https://www.pngjewellers.com/pages/investors#financial-results वर प्रसिद्ध करण्यात आले आहेत आणि ते क्यूआर कोड स्कॅन करून प्राप्त करता येतील.

**ठिकाणः पुणे**
**दिनांकः १२ ऑगस्ट, २०२५**

**मंडळाच्या आदेशाद्वारे**
**सही/-**
**सौरभ गाडगीळ**
**व्यवस्थापकीय संचालक**
**(डीआयएनः ००६१६५६३)**

*टीपः वरील माहिती सेबी (सुचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ४७(१) सह वाचावयाच्या विनियमन ३३ नुसार आहे.*


# सेन्सेक्समध्ये पुन्हा घसरण; निफ्टी २४,५०० खाली

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** चीनवरील व्यापार कराची अंमलबजावणी आणखी ९० दिवस लांबणीवर टाकण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाने जगभरातील बाजारात दिलासादायी तेजी सुरू असताना, मंगळवारी स्थानिक बाजारात घसरणीने सेन्सेक्स आणि निफ्टी नकारात्मक पातळीवर स्थिरावले. सोमवारी दिसलेली तेजीवाल्यांची सक्रियता अल्पजीवी ठरली आणि ब्लू-चिप बँक शेअरमधील विक्रीने घसरणीला हातभार लावला.

अत्यंत अस्थिर सत्राच्या अखेर सेन्सेक्समध्ये ३६८.४९ अंशांची घसरण झाली आणि तो ८०,२३५.५९ पातळीवर स्थिरावला. दिवसभरात त्याने ८०,९९७.६७ अंशांची उच्चांकी आणि ८०,१६४.३६ अंशांची नीचांकी पातळी गाठली होती. दुसरीकडे निफ्टीमध्ये ९७.६५ अंशांची घसरण झाली आणि तो २४,४८७.४० पातळीवर बंद झाला.

येत्या १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ट्रम्प-पुतिन चर्चेतून आशादायी फलिताचीही गुंतवणूकदार उत्सुकतेने वाट पाहात आहेत.

सेन्सेक्समधील आघाडीच्या कंपन्यांमध्ये, बजाज फायनान्स, ट्रेंट, हिंदुस्तान युनिलिव्हर, एचडीएफसी बँक, बजाज फिनसर्व्ह, आयसीआयसीआय बँक आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स यांच्या समभागात सर्वाधिक घसरण झाली. तर मारुती, टेक महिंद्र, महिंद्र अँड महिंद्र आणि एनटीपीसी यांचे समभाग वधारले. सोमवारच्या सत्रात परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) १,२०२.६५ कोटी रुपये मूल्याच्या समभागांची विक्री केली.

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहिल्यानगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.